**फौजदार किरकोळ अर्ज नं.६३/२०१८**

मायावती जगन्नाथ पाटील वि. जगन्नाथ पाटील

**निशाण नं.३७/क/लगत**

**<u>सामनेवाला तर्फे साक्षीदार यांचा उलटतपास अर्जदार तर्फे वकील श्रीमती. आय. पी भोसले यांचे मार्फत शपथेवर सुरु,</u>**

११.या पूर्वी पोटगीचा अर्ज दाखल केला होता त्यामध्ये सातशे रुपये पोटगी मंजूर झाली होती किंवा कसे हे मला आठवत नाही. सदर प्रकरणामध्ये माझ्याविरुद्ध पोटगी वसुली चालू आहे किंवा कसे हे मला आठवत नाही. सदर प्रकरणामध्ये मी पैसे भरतो किंवा कसे ते मला आठवत नाही. माझ्या माहितीनुसार माझी मुले पोटगी रक्कम कोर्टात भरत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन २००४ मध्ये दाखल केलेल्या पोटगी अर्जानंतर सध्या जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती व खर्चात वाढ झालेली आहे. सध्या महागाई वाढली आहे किंवा कसे ते मला कळत नाही. सध्या एखाद्या माणसाला जगण्याकरिता अंदाजे पाच हजार रुपये खर्च येतो किंवा कसे हे मला समजत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सध्याच्या महागाईमध्ये सातशे रुपयामध्ये भागू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हिचे सातशे रुपये पोटगीमध्ये भागत नाही. अर्जदार हिचे गर्भाशयाचे ऑपरेशन झाले होते किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. अर्जदार हिचे ऑपरेशन झाले होते व तिला ४५ ते ५० हजार रुपये खर्च आला होता किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला सदरचा खर्च उसने पैसे घेवून भागवावा लागला. अर्जदार हिचे वडील मयत आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. माझ्या गावातील बऱ्याच लोकांना कोरोना झाला होता किंवा कसे ते मला आठवत नाही. माझ्या माहितीनुसार अर्जदार हिला कोरोना झाला होता. अर्जदार हिला वयोमानापरत्वे, आजारपणामुळे काही काम जमत आहे किंवा कसे ते मला आठवत नाही.

१२.     हे म्हणणे खरे आहे की, मला नोकरीमध्ये फन्ड ग्रॅज्युटी मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला पेन्शन मिळते. हे म्हणणे खरे नाही की, माझी अडीच ते तीन एकर बागायती शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतीमध्ये उसाचे पीक होते. आमच्या गावाला पाण्याची स्कीम आहे किंवा कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावावर असलेल्या शेतामधून मला वर्षाला तीन लाखांचे उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतातून मी भात, भुईमूग, मका, सोयाबीन व भाजीपाला यांचे पीक घेतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर घेत असलेल्या पिकापासून मला उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे दुभती जनावरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी डेअरीला दुध घालतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे दुभती जनावरे असून मला त्यांच्यापासून उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, शहापूर गावातील तीन घरांचे असेसमेंट उतारे माझ्या नावावर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावावर मालकीची तीन घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे राहते घर सोडून उरलेली दोन घरे मी भाडयाने दिलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला घर भाडयाचे अंदाजे पाच हजार रुपये दरमहा मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला वाढीव पोटगी देण्याची माझी ऐपत आहे.

<u>**वकिलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**</u>

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/–

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. ०६.०१.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा